


# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत जनहितार्थ माहिती सादर

## नागरिकांसाठी आजारांबद्दल मराठीत माहिती २०२५



मा. प्रकाश आबिटकर
माननीय मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण महाराष्ट्र राज्य

# झिका विषाणू बद्दल माहिती




## झिका विषाणू म्हणजे काय?

झिका हा फ्लॅव्ही व्हायरस प्रजातीतील विषाणू आहे जो संक्रमित डास चावल्यानंतर शरीरात प्रवेश करतो. तो गर्भवती महिलांमधून गर्भातही पसरू शकतो..



❓ **लक्षणे कोणती असतात ?**

उत्तर: - सौम्य ताप
- त्वचेवर पुरळ (खाज सुटणारे)
- सांधेदुखी, स्नायूदुखी
- डोळे लालसर होणे
- थकवा, डोकेदुखी
- मळमळ, भूक मंदावणे

❓ **गर्भवती महिलांसाठी धोका काय आहे ?**

उत्तर: झिका विषाणू गर्भात मायक्रोसेफली (डोक्याचा घेर कमी असणे) , न्यूरोलॉजिकल दोष, गर्भपात किंवा अकाली जन्म यासारख्या गुंतागुंती निर्माण करू शकतो.

❓ **झिका कसा पसरतो ?**

उत्तर: - संक्रमित डास चावल्याने
- गर्भवती महिलांमधून गर्भात
- असुरक्षित लैंगिक संबंध
- रक्त संक्रमण



## ❓ उपचार काय आहेत ?

उत्तर:
- विशिष्ट औषध किंवा लस उपलब्ध नाही
- पॅरासिटामॉल तापासाठी
- भरपूर द्रवपदार्थ (पाणी , नारळपाणी)
- विश्रांती आणि पोषण
- NSAIDs (जसे Ibuprofen) टाळावेत

## ❓ टाळण्यासाठी काय उपाय करावेत ?

उत्तर:
- मच्छरदाणी , कीटकनाशक वापरा
- घरात आणि आजूबाजूला पाणी साचू देऊ नका
- लांब बाहीचे कपडे घाला
- सुरक्षित लैंगिक संबंध ठेवा
- गर्भवती महिलांनी झिका प्रभावित भागात प्रवास टाळावा

## ❓ कधी डॉक्टरांकडे जावे ?

उत्तर:
- ताप, पुरळ, डोकेदुखी , डोळे लालसर होणे दिसल्यास
- गर्भवती महिलांमध्ये कोणतीही लक्षणे आढळल्यास
- झिका प्रभावित भागातून परतल्यानंतर